शाळा - आमची शाळा - माझी शाळा

मी कु. यमुना बळवंत जोशी, गोळे कॉलनी (आता सौ. नलिनी लिमये, मॉडेल कॉलनी, नाशिक), १९४७ साली ग. ग. शाळेमध्ये ५वी इयत्तेत प्रवेश घेण्यासाठी शाळेत गेले. त्यावेळी मराठी आणि गणित या विषयांची लेखी परीक्षा घेत असत ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या तारखेला. त्यानंतर काही दिवसांनी परीक्षेला बसलेल्या प्रवेश इच्छुक मुलींना बोलावून मुख्याध्यापिका प्रवेशाबद्दल निकाल सांगत असत. प्रवेश दिला गेलेल्या विद्यार्थिनी एका बाजुस व प्रवेश नाकारलेल्या विद्यार्थिनींना अलग करुन त्यांस "प्रवेश नाही", हे सांगितले जात असे. साधारणतः ४०-४५ विद्यार्थिनी प्रवेश इच्छुक असत. त्यांतील ३०जणींना प्रवेश मिळे. ५ जागा बदलीहुन आलेल्या सरकारी नोकरांचे मुलींसाठी राखीव असत. इयत्त ५वी ते ११वी पर्यंत त्यावेळी प्रत्येक इयत्तेची एकच तुकडी होती.

१९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले. १५ ऑगस्ट १९४७ स्वातंत्र्य दिवस. त्यादिवशी माझ्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थिनीला घरुन १ पणती - तेल- वाती सकट आणावयास सांगितले. जमलेल्या सर्व पणत्या वरच्या वर्गातील विद्यार्थिनींनी पेटवुन संध्याकाळी सर्व इमारतीमध्ये व सभोवार रोषणाई केली. आम्ही संध्याकाळी तो देखावा पहाण्यास शाळेत गेलो होतो. आम्हाला त्या दिवशी खाऊ दिला गेला व एक धातूचे पदक दिले होते.

माझ्या आठवणीप्रमाणे त्या काळांत सर्व विद्यार्थिनींना एक वाटी ताक दिले जात असे. आम्ही सर्वजणी आपआपल्या घरुन वाटी आणत असू. मी १९४७ (५वी) ते १९५४ (११वी) अशी सात वर्षे त्या शाळेची विद्यार्थिनी होते.

ग. ग.शाळेत शिक्षण घेतलेली मी पुढील आयुष्यात B.A.M.Ed.झाले. B.A.ला Economics आणि B.Ed.ला इंग्रजी व भुगोल विषय होते. M.Ed. ला विद्यापीठांत प्रथम आले आणि कल्याणजी प्राईझची मानकरी झाले. तत्कालिन महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व विद्यापीठाचे कुलगुरु आदरणीय अलियावर जंग यांच्या हस्ते M.Ed. चे विद्यापीठातील प्रथम पारितोषिक स्विकारतानाची आठवण :-



मी सुरवातीला Sales Tax Department मध्ये नोकरी केली नंतर शिक्षिका म्हणून ग. ग. हायस्कूल नाशिक, मॉडर्न हायस्कूल, पुणे आणि १९८६ ते १९९५ पर्यंत नाशिक येथील C.H.M.E.च्या भोंसला मिलिटरी स्कूल मध्ये शिक्षिका आणि त्याच संस्थेच्या विद्या प्रबोधिनी प्रशाळेची पहिली मुख्याध्यापिका म्हणून काम केले.

मला घडविणारी माझी शाळा १०० वर्षे पूर्ण करीत आहे. याचा मला -आम्हा सर्वांना खूप आनंद व अभिमान वाटतो.

यमुना जोशी (सौ. नलिनी लिमये)

२१, मॉडेल कॉलनी कॉलेज रोड, नाशिक ४२२-००५

फोन 0253 -2341698, मोबाईल 94 2355 5799